**परोपकारा वाहिले अवघे जीवन तुम्ही**

**चाल : लग जा गले के फिर ये हसीं रात हो ना हो**

परोपकारा वाहिले अवघे जीवन तुम्ही
मानवतेला जाहले समर्पण तुम्हीं।।धृ।।

अंगीकारुनी स्वतः मग दुज्यास बोधले
केले आधी मग तुम्ही, करवून घेतले
ऐकून आधी वर्तले, मग ते वचन तुम्ही
मानवतेला जाहले समर्पण ।।१।।

दीन दुबळ्या, दुःखी जीवा, ओढीयेले समीप
त्या हृदयी तेवियला, आध्यात्म ज्ञानदिप
मनी तयांच्या फुलविले, भक्ति सुमन तुम्ही
मानवतेला जाहले समर्पण ।।२।।

सान थोरा सन्मानिले, देऊन प्रेम अपार
अथक परिश्रम घेऊन, केला ज्ञान प्रचार
देशो विदेशी निरंकारी, नेली मिशन तुम्ही
मानवतेला जाहले समर्पण ।।३।।

सविंदर हरदेव तुम्हीच हि,सुदिक्षा दिधली
रूपे सद्गुरूच्या आम्हां, हि भिक्षा दिधली
एकनाथाचे शत- शत स्विकारा नमन तुम्ही
मानवतेला जाहले समर्पण ।।४।।